# सृजन

ई दीपावली विशेष २०११





दीपावली विशेष... २०११


संपादक :

**प्रसाद इनामदार**

मुखपृष्ठ :

**प्रदीप घोडके**

अंक सजावट व मांडणी :

**सूर्यकांत बंडगर**

तांत्रिक सहकार्य :

**विनायक पाचलग**



अंकात व्यक्त झालेली मते त्या त्या लेखकांची आहेत. त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



संपर्क : http://prajkta-prajkta.blogspot.com



सृजन
दीपावली विशेष... २०११

# मनोगत

पावसाळा संपलेला असतो. थंडीच्या स्पर्शाने चित्तवृत्ती मोहरू लागतात आणि दीपोत्सवाचा प्रकाश मनामनात पेरण्यासाठी दीपावलीच्या हळुवार पावलांची चाहूल लागते. धुक्याच्या रेशमस्पर्शाची अनुभूती अधूनमधून होते आणि मग ही चाहूल आणखी ठळक होते. खळ्यावरचं धान्य बळीराजाच्या सोप्यात आणि बोनसचा आकडा नोकरदारांच्या खिशात वाजू लागतो तेव्हा ती उंबरठ्याबाहेर पोचलेली असते. बालगोपाळांचे किल्ले सजू लागतात, तळणीचा घमघमाट नाकाभोवती रुंजी घालू लागतो आणि दिवाळीच्या स्वागताची उत्सुकता मनात शिगोशीग भरली जाते. नरकचतुर्दशीच्या अवसेमुळे भरून राहिलेला अंधार दूर करण्यासाठी लुकलुकत्या तेजांनी ती घराघरांत येते आणि चैतन्याचा सोहळा सुरू होतो. वर्षभराचा सारा आनंद ठेवा पोतडीतून बाहेर निघतो आणि साऱ्या अंगणभर त्याचा महोत्सव फेर धरू लागतो....

लुकलुकणाऱ्या तेजाची दुनिया भूतलावर अवतरत असताना सरस्वतीचे सेवकही साहित्य विश्वाला समृद्ध करण्याचा प्रयत्न करू लागतात आणि दिवाळी अंकाचा एक आगळा महोत्सव भरतो. आम्हीही यंदा या महोत्सवाचे पाईक होण्याचे ठरविले. खारीचा वाटा उचलायचे ठरविले. आम्ही 'सृजन'ला हाक देण्याचा प्रयत्न केला. हा उपद्व्याप मांडला, आमच्या स्नेहींना, आमच्यावर प्रेम करणाऱ्यांना साद घातली आणि अक्षरशः सर्व व्यापांतून वेळ काढून त्यांनी तुडुंब प्रतिसाद दिला. कौतुकाची थापही टाकली. त्यामुळे छाती भरून आली. या सर्वांच्या कौतुकाला पात्र राहण्याचा प्रयत्न करत आहे. पहिले पाऊल तर टाकले आहे. ते किती नीटसं पडलेय ते तुम्ही सांगालच ही खात्री आहे.

ब्लॉगच्या माध्यमातून हा 'ई दिवाळी अंक' तुमच्या संगणकावर ठेवताना आनंदाचं भरतं आलेलं आहे. आपल्या बहुमूल्य वेळातून वेळ काढून माझ्यासारख्या धडपड्यावर विश्वास ठेवून लिखाण करून 'सृजना'त बळ भरल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. शीर्षकाला साजेसे देखणे मुखपृष्ठ साकारणारे प्रदीपजी घोडके आणि अंक देखणा करण्यासाठी धडपडणारा मित्र सूर्यकांत आणि अंक तुमच्यापर्यंत पोचविण्याची जबाबदारी सगळे उपद्व्याप सांभाळून करणारा विनायक यांच्याशिवाय हे 'सृजन' अपूर्ण होते. पहिला प्रयत्न गोड मानून घ्याल आणि आणखी धडपडीसाठी आशीर्वाद द्याल ही खात्री आहे.

सर्व वाचकांना दीपावलीच्या प्रकाशभरल्या शुभेच्छा!

**– संपादक**
sonnuprasad@gmail.com



# अंतरंग


भाष्य : **अण्णांचे आंदोलन** : श्रीपाद कुलकर्णी

ललित : **आकाशगंगा** : मल्हार अरणकल्ले

महिला : **मालिकांचे भासमान जग** : प्रिया आमोद

ग्राफिटी : अभिजित पेंढारकर

तरुणाई : **दो दिये ज्यादा जलाओ** : विनायक पाचलग

लघुकथा : **पौर्णिमा** : प्रवीण कुलकर्णी

कविता : सौ. सुप्रिया वकील, श्रीपाद कुलकर्णी

चिमटा : **आयचा घो (टाळा)** : श्रीपाद ब्रह्मे

कोकण देशा : **कोकणसाठी न उमजलेला 'उद्योग'**: शिवप्रसाद देसाई

ग्रामीण कथा : **शिकार** : कुमार कांबळे

विनोद : मुकुंद फडके

भटकंती : **कावळ्याच्या माथ्यावर..** : उदय हर्डीकर

आठवण : **मनस्वी कलावंत!** : जगदीश जोशी

नवल : **'घंटा' म्हणजे काय रे भाऊ?** : सुरेंद्र पाटसकर

नेट-भेट : **नेटवर्किंगच्या विश्वात** : संतोष धायबर



दीपावली विशेष... २०११





# अण्णा...
# आंदोलनाला पाठबळ कशामुळे?

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनामुळे देश ढवळून निघाला. जनलोकपाल विधेयकाची फारशी माहिती नसलेला सर्वसामान्य माणूस अण्णा हजारे यांना पाठिंब्यासाठी रस्त्यावर आला. ज्यांना रस्त्यावर येता आले नाही, तेही मनाने अण्णांच्या पाठीशी होते. या आंदोलनानंतर टीम अण्णाबाबत अनेक वाद निर्माण झाले आहेत. आंदोलनाच्या भविष्याविषयी सध्या काही ठोस सांगता येत नाही; पण असे आंदोलन झालेच कशामुळे? याचा विचार करणे अपरिहार्य आहे...

ऑगस्ट महिन्यात जनलोकपाल विधेयकासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे उपोषणाला बसले. रामदेव बाबांप्रमाणे हे आंदोलन उधळून लावण्याचा सरकारचा विचार होता; मात्र श्री. हजारे यांना देशभरातून मिळालेल्या पाठिंब्यामुळे सरकारला दोन पावले मागे सरकावे लागले. संसदेला त्याची दखल घ्यावी लागली. हे आंदोलन म्हणजे संसदेवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न आहे काय? अशी चर्चाही देशभर सुरू झाली. देशभरातील जनता अण्णांच्या मागे कशामुळे उभी राहिली? हा प्रश्न या आंदोलनातून निर्माण झाला आणि तोच आता सर्व राजकीय नेत्यांना सतावत आहे. त्यामुळे सत्ताधारी काँग्रेस भ्रष्टाचाराच्या विरोधात कठोर कायदा करण्याची भाषा बोलत आहे. प्रमुख विरोधक भारतीय जनता पक्षाने ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवानी यांना पुन्हा एकदा रथयात्रेच्या रस्त्यावर उतरविले आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधात त्यांची ही यात्रा आहे, असे पक्षाकडून सांगण्यात येत आहे.

अण्णा हजारे यांची तुलना महात्मा गांधी, जयप्रकाश नारायण यांच्याशीही केली जात आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी आणि जयप्रकाश नारायण (जेपी) यांच्या आंदोलनांबरोबर हजारे यांच्या आंदोलनाची मीमांसा केली पाहिजे. महात्मा गांधी यांनी अहिंसेच्या जोरावर स्वातंत्र्याचे आंदोलन उभारले. त्यांच्या पाठीशी देश उभा राहिला. त्यांचे नेतृत्व जगभरात वादातीत आहे. गांधी पर्व १९४८ मध्ये थांबले. त्यानंतर स्वातंत्र्य मिळालेल्या भारत नावाच्या देशाने पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली वाटचाल सुरू केली. तो काळ आशा-आकांक्षांनी भरलेला आणि भारलेला होता. नेहरू आणि त्यांच्या नंतर लालबहादूर शास्त्री





यांची कारकीर्द देशाने अनुभवली. या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधी यांचे पर्व सुरू झाले.

महात्मा गांधी यांच्या आंदोलनानंतर सुमारे २५-२६ वर्षांचा काळ लोटला होता. दोन पिढ्या पुढे सरकल्या होत्या. त्यावेळच्या तरुणांना महात्मा गांधी ऐकून माहिती होते. सत्तेचा मनमानी वापर करणाऱ्या इंदिरा गांधींच्या विरोधात जेपींनी आंदोलन उभारले. या आंदोलनाला राजकीय पाठबळ होते. स्वातंत्र्यानंतरच्या आकांक्षा पूर्ण न झालेला तरुण या आंदोलनात उतरला. त्यातून ऐतिहासिक सत्तांतर झाले. पुढे विरोधकांना सत्ता टिकवून ठेवता आली नाही आणि पुन्हा एकदा इंदिरा गांधी सत्तेत आल्या. अपेक्षाभंग झालेली तरुण पिढी या आंदोलनात एकवटली होती. महात्मा गांधींचे आंदोलन पाहिलेले. त्यांच्या आंदोलनात सहभागी झालेले फारसे कोणी जेपींच्या आंदोलनात नव्हते. त्यांनी जेपींमध्ये एक महात्मा पाहिला. जेपींवर विश्वास टाकला.

या आंदोलनाला आता ३५हून अधिक वर्षे होऊन गेली आहेत. जेपींच्या आंदोलनात सहभागी झालेली आणीबाणी अनुभवलेली त्यावेळची तरुण पिढी आता राहिली नाही. जेपींच्या आंदोलनाची माहिती आताच्या पिढीला ऐकून माहिती आहे. कदाचित अनेकांना त्याबाबत फारशी माहितीही नसेल. तीन-साडेतीन पिढ्यांनंतर श्री. हजारे यांचे आंदोलन झाले. दरम्यानच्या काळात दोन मोठ्या आणि महत्त्वाच्या घटना घडल्या. १९९२मध्ये बाबरी मशीद पाडण्यात आली. या आंदोलनामुळे देशाची अत्यंत ठळक धार्मिक फाळणी झाली. या फाळणीचे चटके देशाने अनेक वर्षे सहन केले. १९९२च्या सुमारास आणखी एक महत्त्वाची घटना घडली. सध्याचे पंतप्रधान व तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. धार्मिक फाळणीच्या धुराळ्यात खुली अर्थव्यवस्था स्वीकारल्याकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही. खुल्या अर्थव्यवस्थेचे परिणाम २०००नंतर दिसू लागले. सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावले. देशात मल्टिप्लेक्स, मॉल आले. विमानांचे प्रवास सर्वसामान्यांना शक्य झाले. जगभरातील नामवंत ब्रँड भारतात आले. देशातील रस्त्यांवर धावणाऱ्या परदेशी गाड्यांची संख्या वाढली. मर्सिडिज, स्कोडा, ऑडी या गाड्या भारतीयांच्या आवाक्यात आल्या. मोठी बाजारपेठ, स्वस्तातील कुशल मनुष्यबळ अशी भारताची ओळख झाली.

या साऱ्या प्रक्रियेत सर्वसामान्यांच्या जगण्याने वेग घेतला. घड्याळाच्या काट्याशी आयुष्य बांधले गेले. जगण्यासाठीच्या संघर्षाची धार तीव्र झाली.



त्यातून मोठ्या प्रमाणात पैशाची निर्मिती होत होती. दुसरीकडे सरकारी कामांसाठी संघर्ष करणाऱ्या याच सर्वसामान्यांना पैसे मोजावे लागत होते. छोट्या-मोठ्या कामांसाठी पैशाचा व्यवहार दैनंदिन जीवनाचा भाग बनला. याच कालखंडात राजकीय व्यवस्थाही पैशाच्या आहारी गेली. निवडणुकांत प्रचंड पैसा ओतायचा. मते विकत घेऊन निवडणुका जिंकल्या जाऊ लागल्या आणि खर्च झालेला पैसा सत्तेच्या माध्यमातून कमवायचा, असे चक्र सुरू झाले. या साऱ्यांसमोर सामान्य माणूस हतबल झाला. श्री. हजारे यांच्या जनलोकपाल विधेयकासाठीच्या आंदोलनासाठी ही पार्श्वभूमी आहे. श्री. हजारे मंदिरात राहतात. त्यांच्याकडे कोणतीही संपत्ती नाही. हा साधेपणा देशातील नागरिकांना भावला. आंदोलनामागे श्री. हजारे यांचा वैयक्तिक स्वार्थ नाही, हे स्पष्ट होते. त्यामुळे त्यांची सर्वसामान्यांनी भरभरून पाठराखण केली. भ्रष्टाचाराच्या विरोधात भूमिका घेणाऱ्यांना देशाने साथ दिल्याचा इतिहास आहे. बोफोर्स गैरव्यवहाराचा आरोप करून विश्वनाथ प्रताप सिंग यांनी राजीव गांधी यांची साथ सोडली. बोफोर्स प्रकरणावरून देश पेटविला. 'राजा नही फकीर है, मुल्क की तकदीर है', असे म्हणत त्यांना जनतेने साथ दिली. सत्ताही दिली होती. बोफोर्सचा गैरव्यवहार ८०-८५ कोटींच्या दलालीचा होता. आता गैरव्यवहाराची रक्कम सर्वसामान्यांना धक्का बसविणारी आहे. टू जी स्पेक्ट्रममुळे एक लाख ७६ हजार कोटींचे नुकसान, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा गैरव्यवहार १७०० कोटींचा... हे भले मोठे आकडे एका बाजूला आणि श्री. हजारे यांचा साधेपणा दुसऱ्या बाजूला. सर्वसामान्यांनी हजारे यांच्या बाजूने कौल दिला आणि देश त्यांच्या मागे एकवटला...

**- श्रीपाद कुलकर्णी**





# आकाशगंगा

एका शाळेचा वर्ग. छोटेखानी. अठरा-वीस लाकडी बाक दाटीवाटीनं ठेवलेले. वर्गाची साठ ही पटसंख्या तेवढ्यात सामावली जाते.

वर्ग तोच होता; पण शिक्षक बदललेले होते. शिक्षक होते : जगविख्यात शास्त्रज्ञ आणि गणिती रँग्लर जयंत नारळीकर.

वेळ दुपारी तीनची. वर्गाबाहेरच्या शाळेच्या परिसरात झाडांच्या सावल्या अंथरलेल्या. प्रवेशद्वार झाडून, पाणी टाकून स्वच्छ केलेलं. पाहुण्यांच्या स्वागतासाठी तिथं मुख्याध्यापिका आणि आणखी दोघी-तिघी सहशिक्षिका उभ्या.

प्रवेशद्वारातून एक गाडी येते. वळण घेऊन उभी राहते. नारळीकर उतरतात. निळ्या रंगाची जिन्स आणि अर्ध्या बाह्यांचा खोचलेला शर्ट. पायांत सँडल्स. प्रवेशद्वारावरील शिक्षिका हात जोडून, लवून स्वागत करतात. उत्तरादाखल नारळीकरही तळवे जुळवून म्हणतात : नमस्कार.

आवाज अगदी हलका. समोरच्यांपुरताच ऐकू जाईल एवढा. चेहऱ्यावर मंद हसू.

नारळीकर थेट वर्गाकडं जातात. बरोबर मुख्याध्यापिका. वर्गातील सर्व बाक भरलेले. नारळीकर वर्गात आल्याचे समजताच मुली उभ्या राहतात. समूहस्वरातील नमस्कारानं पाहुण्यांचं स्वागत होतं.

वर्ग सुरू होतो. नारळीकर टेबलावर एका बाजूला टेकून उभे. विषयाला लगेचच सुरवात. विषय आहे : आकाशातील विश्वगंगा.

बोलण्याचं माध्यम मराठी. अगदी साधं-सोपं. चुकूनही इंग्रजी शब्दाचा उच्चार नाही. सांगणं विशिष्ट लयीत. सगळ्यांना कळेल इतकं संथ. भरपूर उदाहरणं. तपशीलवार वर्णन.

वर्गात कमालीची शांतता. साऱ्यांचे कान नारळीकरांच्या बोलण्याकडं.





नारळीकरांचं सांगणं एवढं परिणामकारक, की त्या इवल्या वर्गाच्या छताला लागून विश्वातील आकाशगंगा ओळीनं उभ्या पसरल्या असल्याचा भास विद्यार्थिनींना व्हावा. आकाशगंगांची रचना कशी असते, त्यांत पांढुरक्या रंगाचे पुंजके कसे फिरत असतात, तेजोगोल कसे वर-खाली होत असतात...सारंच विलक्षण होतं. ऐकणं म्हणून आणि अनुभव म्हणूनही.

पुढं सरकणारा वेळ घड्याळाच्या तबकडीवर थबकला असावा; कारण तिकडं कोणाचंच लक्ष नव्हतं. नारळीकरांचा वर्ग संपला. आता प्रश्नोत्तरांसाठी वेळ होता. अनेक मुलींना प्रश्न विचारले. नारळीकरांनी सर्व प्रश्नांना समाधानकारक उत्तरं दिली. मुली आनंदित झाल्या. टाळ्यांची दाद देत राहिल्या.

"वर्गात पाहुण्यांकडून जे ऐकलं, त्याबद्दल तुम्हांला काय वाटलं?'' -- मुख्याध्यापिकांनी मुलींना विचारलं.

बाकांवरून अनेक हात उंच झाले. एकेक मुलगी मतं मांडू लागली. मोजकी आणि समर्पक.

नारळीकरांना सारंच मनापासून भावत होतं. त्यांच्या चेहऱ्यावर त्याचा विस्मय दर क्षणी बदलत जाताना दिसत होता.

एक मुलगी उभी. नारळीकर ध्यान देऊन ऐकू लागतात. मुलगी म्हणते : "सर, आम्ही आज आकाशगंगा पाहिली. तिच्या प्रवाहात हात बुचकळून पाहिले. प्रवाहात धावणाऱ्या रजतकणांशी आम्ही शिवाशिवी खेळलो. आमच्या पापण्यांच्या आड दडलेला अंधार भेदून आम्ही आज प्रकाश पाहिला. सर, आम्ही आज आकाशगंगा पाहिली.''

नारळीकर क्षणभर स्तब्ध. आश्चर्यचकीत. मुख्याध्यापिकाही मूक उभ्या. साऱ्या वर्गभर दृष्टिलाभाचा लख्ख चमत्कार आकाशगंगा होऊन वाहत असल्याचा भास मला झाला.

खगोलीय चमत्काराचा आनंद मनात साठवून, शाळेच्या आवारातून बाहेर पडताना फलकावरील अक्षरांकडं लक्ष गेलं. 'अंधशाळा' ही तिथली अक्षरं किती डोळस आहेत, त्याचा विस्मित अनुभव गाठीला घेऊन बाहेर पडलो.

**– मल्हार अरणकल्ले**





# मालिकांचे भासमान जग

भारतीय समाजमनावर अनेक गोष्टींचा प्रभाव वेळोवेळी पडत आलेला आहे. गेली काही वर्षे आणि सध्या दूरदर्शनवरील विविध वाहिन्यांनी समाजमनावर गारूड केले आहे. करमणुकीसाठी म्हणून आलेल्या या मालिकांनी भारतीय जीवनशैलीवर ठाशीव प्रभाव टाकलेला आहे. मालिका आणि त्यातील पात्रांची लोकप्रियता चकित करून टाकणारी आहे. मालिका त्यांचे अर्थकारण आणि मालिकांचा लोकांवर होणारा परिणाम हे खरंतर स्वतंत्र अभ्यासाचे विषय आहेत. एखादी गोष्ट माणसाच्या दैनंदिन जीवनाचा मोठा वेळ, व्यवसाय व्यापून टाकत असेल तर त्या गोष्टीची सहज चर्चा होणेही अपरिहार्य आहे.

मी खेड्यापाड्यातील महिलांसाठी आरोग्य शिबिरात काम करते. अगदी सुदूर असलेले धनगरवाडी, वस्त्या इथेही जावे लागते. ज्या ठिकाणी पाण्याचीही सोय नाही अशा ठिकाणी मराठी, हिंदी मालिका पाहण्याची मात्र सोय आहे. तिथल्या अशिक्षित महिला रोज न चुकता दिवसातील काही तास मालिका पाहण्यात घालवतात. खोट्या जगाला खरे मानून त्यात रममाण होतात. मालिकेतील प्रसंग, पात्रे, त्यांची सुख-दुःखे, जय-पराजय, यात स्वतःची दुःखे, समस्या विसरण्याचा प्रयत्न करतात. केवळ खेड्यातीलच नव्हे तर शहरातील सुशिक्षित महिलांचा दिनक्रम मालिकांच्या वेळापत्रकानुसार आखलेला असतो. मालिका एखाद दिवशी पाहता आली नाही तर महिला अस्वस्थ होतात. मालिकांचे असे व्यसन स्त्रियांना लागण्याचे कारण काय असावे? याचा विचार करताना, मला आढळून आले की मालिकेचा उपयोग केवळ करमणूक इतपत मर्यादित न राहता, त्याही पुढे जाऊन या मालिका स्त्रियांच्या आयुष्यात ङ्कंफर्ट फॅक्टरफ्चे काम करत आहेत. माणूस तणावाखाली असला आणि त्याच्या तणावावर समाधानकारक तोडगा निघत नसेल तर तो मानसिक समाधानासाठी सतत खात राहतो, अशा खाण्यालाङ्क कंफर्ट फूडफअसे म्हणतात. त्याच पद्धतीने रोज तोच तोच दिनक्रम पार पाडणाऱ्या, अपेक्षांची पूर्ती होऊ न शकल्यामुळे असमाधानी, नातेसंबंधांतून अपेक्षित गोष्ट न मिळाल्यामुळे येणारा उबग यामुळे एक मोठी पोकळी स्त्रियांच्या आयुष्यात तयार होते. स्त्रिया आपला ताण विसरण्यासाठी मालिका पाहतात आणि रिकामेपणा भरण्यासाठी मालिकांचा ङ्कंफर्ट फॅक्टरफम्हणून उपयोग होतो.

आज विविध वाहिन्यांवरील मालिकांमधून स्त्रियांसमोर पारंपरिक पुरुषप्रधान संस्कृतीचे गोडवे गाणारी पात्रे स्त्रीला भोगवस्तू व कुटुंबासाठी त्याग करणारी



मूर्ती अशा दोन ठळक भागांत विभागतात. सहनशील, त्यागी, कनवाळू, प्रेमळ, कष्टाळू अशी स्त्रीची प्रतिमा एकतर या मालिकांमधून समोर येते अथवा दुष्ट, कुटुंबाची पर्वा न करणारी, व्यक्तीवादी, कारस्थानी, सत्तापिपासू अशी खलनायकी प्रतिमा मालिकांमधून मांडली जाते. अर्थात इतके ढोबळ दोनच पर्याय जेव्हा तुमच्यासमोर येतात तेव्हा पहिल्या प्रतिमेला स्त्रिया मनोमन पसंती देत असतात. अंधश्रद्धा, चमत्कार, बुवाबाजी, अतार्किक भक्ती अशा गोष्टींच्या आहारी गेलेल्या या मालिकांतील पात्रे स्त्रियांना हवीहवीशी वाटतात. पुरोगामी महाराष्ट्रात स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी मेहनतीने स्त्रीला माणूस म्हणून दर्जा मिळावा या साठी जे कष्ट घेतले आहेत त्यावर पाणी फिरवण्याचे काम मोठ्या ग्लॅमरस पद्धतीने केले जात आहे. मालिका बनविणारे, लिहिणारे, पात्रे अभिनित करणाऱ्या स्त्रिया या उद्योगाकडे फक्त चरितार्थाचे, प्रसिद्धी मिळविण्याचे साधन म्हणून पाहत आहेत, तर प्रेक्षकवर्ग मात्र आपला महत्त्वाचा वेळ, निर्मितीक्षम वेळ या भाकडकथा खऱ्या मानून त्यात वाया घालवत आहे.

करमणूक म्हणून एखादी मालिका पाहण्यापेक्षा मालिकांच्या भासमान जगात रमणाऱ्या स्त्रियांना वास्तवाची जाणीव करून देणे काळाची मागणी आहे.

**- डॉ. प्रिया आमोद**



## ग्राफिटी

**दगड फोडून फोडून**
**मला वीट आलाय.**

**जातीयवादाच्या विरोधातील लढ्यात**
**मी जातीनं उतरलो आहे!**

**दुसऱ्याचं रक्त पिणं**
**हे डासांच्या रक्तातच असतं...**

**- अभिजित पेंढारकर**





# ‘दो दिये ज्यादा जलाओ...’

एखादी गोष्ट ना कंप्लिट डोक्यात घुसते. काही केल्या मनातून जात नाही. अगदी तसं झालंय माझं. काल एक जाहिरात बघितली. कोका-कोलाची... दिवाळी स्पेशल, ‘दो दिये ज्यादा जलाओ...’ प्रचंड आवडली. तशा मला जाहिराती, त्यातली क्रिएटिव्हिटी सगळंच जाम आवडतं... पण इसकी तो कुछ बात ही और थी...

म्हणजे, त्याचं असंही झालं, की या वेळी दिवाळीवर काही लिहायचं हे तर ठरलेलं; पण काय लिहायचं? म्हणजे काय आहे की दिवाळीला एवढी सगळी जणं एवढं काहीबाही लिहितात. दिवाळी अंक, साप्ताहिक, पेपर, विशेषांक बाप रे बाप...!!! त्यात ऑलमोस्ट सगळे विषय कव्हर होऊन जातात, मग आपण वेगळे काय दिवे लावणार... या ॲडमुळे लेखाचं शीर्षक वगैरे मिळालेले... पण पुढे...?

तसंही सायकॉलॉजीचे डोस तर मिळत असतातच. ‘दिवाळी आहे, जरा नीट राहा, उगाच फटाके कशाला फोडता रे’...इ. इ. मग त्यात आपण आणि हे असे व्हायला पाहिजे, ते तसे व्हायला पाहिजे, असं म्हणून काय फायदा. त्यात दिवाळीचं एक बरं आहे, तिचे रूप असे फारसे पालटलेले नाही. म्हणजे गणपतीच्या उत्सवाचे काही वेगळेच झाले, ‘दांडिया’तून काही तरी वेगळेच साधायचा प्रयत्न केला जाऊ लागला; पण दिवाळी मात्र अशी आहे, तशी आहे. छान आहे ते!

तशी आमची पिढी वेगळीच ...त्यामुळे आमची दिवाळीही. म्हणजे तशी आम्ही दिवाळीही नेहमीच साजरी करतो. मूड आला, नवीन फॅशन आली की खरेदी होतेच. फराळ काय हो... आठवड्यातले चार दिवस आम्ही असलं चटकदार काहीतरी खातो आणि इंडियाची मॅच, निवडणूक, कोणाचा वाढदिवस... फटाकेही ऑलमोस्ट रोजचेच... आणि.. ‘हॅपी दिवाळी’चे आर्टिफिशियल एसएमएस तर आम्ही रोजच करतो.

पण तरीही दिवाळी आम्हाला आवडते. माहौल असतो तो... तो नीट एंजॉय करता यायला हवा. लोक काय काय ॲक्टिव्हिटी करतात. जवानांना फराळ, दिवाळी पहाट, काही ना बाही... सगळेच मनापासून करतात असं नाही,





प्रसिद्धीलोलुप बरेच... पण कोणीतरी मनापासून काहीतरी करतंय याचा फार आनंद वाटतो. किल्ला, राडा, सगळंच मस्त...

तुम्हाला मी माझ्या दिवाळीबद्दल सांगू का? तसा दिवाळी माझा फेवरेट सण, उत्सव नाही. तो मान गणपतीचा, पण दिवाळीही आवडते. घरी करंजी करायला मी मदत करतो. ळ श्रींेश िंहरीं  किल्ला करणं थांबलंय, पण शाळेत असताना जबरदस्त किल्ले केलेत. दिवाळीच्या आदल्या रात्री महाद्वार रोडवर गर्दीचा महापूर उसळलेला असतो. माझे असे बरेच मित्र आहेत, जे रात्रभर खरेदी करतात आणि नरक चतुर्दशीला पहाटे आंघोळ... नो झोप... मला त्यांचा अभिमान वाटतो. गेली ३ वर्षे माझा एक मित्र (ज्युनिअर) मला स्वहस्ताक्षरात शुभेच्छांचे पोस्टकार्ड पाठवतो. आजकाल माझ्याही नकळत मी त्या पत्रांची वाट पाहायला लागलो आहे. अशीच एक गंमतशीर गोष्ट. परवा एका लेखाचे नाव होते, 'पणती जपून ठेवा' तेव्हा सगळं गाणंच आठवलं. लहानपणी फेवरिट होतं माझं.

असो, हे अन् आता बरंच काही... तर मग यावर्षी काय करायचं? काहीतरी करायचंय यार..' दो दिये ज्यादा जलाओ'. पण मला तसं खरंखुरं सगळीकडे पणत्या नाही लावता येणार मग? विचारांच्या पणत्या लावल्या तर... स्वतःच्याच मनात. आजकाल जगणं एवढं फास्ट झालंय की थांबून मागं पाहायलाच विसरलोय आपण... थोडं थांबून बघूया म्हणतोय आणि खूप मुखवटे लावून जगतो आपण. ते मुखवटे बाजूला काढून खरंखुरं स्वतः जगत आहे तसं जगून बघायचंय... या दिवाळीत... मग बाकी छोटे-मोठे बदल म्हणजे उगाचच एसएमएस न करता ठराविक मित्रांना फोन करून मनापासून शुभेच्छा द्यायच्यात. नवे कपडे घालायचेत, पण कोणा इतरांसाठी शायनिंग मारायला नव्हे, तर स्वतःला छान वाटतं म्हणून...निवांत दिवाळी अंक वायाचयेत... किल्ला करताना बघायचंय... बघू काय काय जमतं ते?

हा तर एव्हाना तुम्ही बोअर झाला असाल... जागा दिलीय म्हणून कायपण लिहीत आहे, असंही वाटत असेल... वाटू दे ना, मला तर बुवा समाधान वाटतंय 'दिल से दिल तक' बाते केल्याने आणि तेच महत्त्वाचं. त्याच जाहिरातीत म्हटलंय, 'इस बार आप किस को खुश कर रहे हो?' मी तर या वेळी 'स्वतःला' खूश करतोय... मुझे खुद को..तुम्हीही इतरांसाठी खूप झटता, भविष्यात सुख, पैसा, मिळावा म्हणून कष्ट करता. यावेळी एकदा स्वतःला खूश करून बघा ना... कारण, तुम्ही खूश तर जमाना खूश...'

**...बाकी दिवाळीच्या अनंत शुभेच्छा अगदी मनापासून...!!**





# पौर्णिमा...

**तो**

गॅलरीत उभं राहून तासन् तास चंद्र न्याहाळण्यात काय मजा असते कोणास ठाऊक. पण ती न्याहाळत बसायची... रात्री तीन तीन वाजता उठून गॅलरीतून चंद्र बघायची... हा चंद्र किती वेगळा भासतो नाही? तिचा नेहमीचा प्रश्न.. या प्रश्नाचे तिला उत्तर हवे असायचेच असे नाही... पण ती रोज हा प्रश्न विचारायची... अशा वेळी कधी चहा किंवा कॉफीचा मग तिच्या हाती दिला की नुसती हसायची... गालातल्या गालात... तिच्या त्या गोबऱ्या सावळ्या गालांवर एक चमक दिसायची.... चंद्राचा प्रकाश तिच्या गालावरून ओघळत राहायचा... ती चंद्राला न्याहाळात राहायची आणि मी तिला... चंद्राची कितीतरी रूपं तिनं कॅमेराबद्ध केली होती... प्रत्येकवेळा तिच्या नजरेतून दिसणारा चंद्र वेगळा भासायचा... तो तिचा चंद्र होता... जणू तिच्यासाठीच रोज उगवायचा... तिच्या भावनांच्या वेग आवेगाप्रमाणे आपली रूपं बदलायचा... कधी झावळ्यांच्या आडोशातून तिला बघायचा तर कधी ढगांशी लपाछपी खेळायचा... तिच्या विस्कटलेल्या केसांत जणू रातराणीचा गंध भरत राहायचा... ती होतीच तशी... जगण्याची मजा लुटणारी... ही अमावस्या नसतीच तर?... कधी कधी ती प्रश्न विचारायची.

"अगं अमावस्या आहे, म्हणूनच तर चंद्राच्या या कला दिसतात ना!"

माझं हे उत्तर तिला कळायचं, पण पटायचं नाही... पण मग ती जास्त बोलायची नाही, गप्प राहायची. तिनं बहुतेक अमावस्या स्वीकारली होती... अशा कितीतरी अमावस्या तिनं स्वीकारल्या होत्याच, कदाचित त्या सगळ्या अमावस्या विसरण्यासाठीच ती चंद्राला जवळ करत होती... त्या आठवणीतून बाहेर पडण्यासाठीच... पण कधी कधी या आठवांचे ढग एवढे गडद व्हायचे की त्यातून चंद्र दिसायचाच नाही... मग एक हुंदका गॅलरीतून यायचा... अशा वेळी तिच्यासोबत असावं... हलकेच तिच्या खांद्यावर हात ठेवावा, असं वाटायचं. पण काही ढग गळलेलेच बरे म्हणून मग मीही लांब राहायचो. तिच्या मोकळ्या होणाऱ्या आकाशासाठी... मग त्यानंतर तिचा चेहरा पौर्णिमेच्या चंद्रासारखा दिसायचा पूर्ण... अपूर्णतेची त्यात छटाही असायची नाही.





## ती

त्याला चंद्र आवडतो का माहीत नाही... नसेल. कदाचित असेलही; पण... आपल्यासाठी तासन् तास गॅलरीत बसून चंद्र बघायचा... आपण काहीबाही बडबडत राहायचो. पण तो नुसता गप्प बसायचा ...कधी कधी वाटायचं, हा चंद्राकडे बघतो की आपल्याकडे?... एकदा त्याला विचारलंही, ''अरे चंद्र बघ किती मस्त दिसतोय, पौर्णिमा हा पूर्णत्वाचा उत्सव असतो बघ.. अपूर्णतेचा लवलेशही नसतो...'' त्यावेळी एकदाच म्हणाला होता,

''पूर्णत्वात मजा नाही... पूर्णत्व आलं की लय सुरू होते... त्यामुळे मजा आहे ती अपूर्णतेत... त्याला अपूर्ण राहायला आवडायचे... तो पाण्याचा ग्लासही पूर्णपणे प्यायचा नाही... थोडं पाणी शिल्लक ठेवायचा... त्यामुळे तो बहुतेक वेळा चंद्राकडे न बघता आपल्याकडेच बघत असल्याचा भास व्हायचा... रात्री तीन-तीन वाजता आपल्यासाठी कॉफी देताना त्याचा चेहरा असाच द्वितीयेच्या चंद्रासारखा दिसायचा.... पूर्णत्वाची आस असलेला... पूर्णत्वाच्या प्रतीक्षेत असलेला तो वेगळाच आहे.... त्याचा चेहराच अनेकवेळा अमावस्येत साथ देतो... तो नसलेल्यापणाची, अर्धवटपणाची जाणीव पिऊन टाकतो. तेच त्याचे वैशिष्ट्य आहे... त्याच्या चेहऱ्यावर एक अजिब लकीर आहे... चंद्रावरच्या खळग्यासारखी ही लकेर नेहमी आधाराचा हात द्यायला तयार असते, पण कधी कधी आधारालाही आधार लागतोच ना... पण त्याची नजर कधी आधार मागत नाही. अपूर्णतेत मजा जशी तो मानतो तशीच सोसण्यात... अशा वेळी त्याला एकटं सोडणं हेच चांगलं... अशावेळी त्याच्या चेहऱ्यावरचे ढग आपण हलकेच दूर करावेत. त्याचा चेहरा हातात घेऊन त्याला विश्वास द्यावा, असं वाटून जायचं. पण आपल्याला ते जमलं नाही... मग तो नजर चुकवत राहायचा. आपल्या वेदना सहन करत राहायचा... त्याचे ढग कधीच फुटले नाहीत... ढग फुटायला, त्यातून पाणी बरसायला गारव्याच्या बिजांचा शिरकाव व्हायला लागतोच की... अनेकदा आपण त्याच्या दारापर्यंत पोचून त्याला रितं करण्याचा विचार केला खरा; पण दारावर थाप मारून आपण अनेकदा मागे फिरलो आहे... आताही त्याच्या ढगांना गारव्याच्या स्पर्शाची आस लागून असेल... कदाचित मग त्यानंतर दिसणारा चेहरा पौर्णिमेच्या चंद्रासारखा पूर्ण दिसून जाईल. त्यात अपूर्णतेची कोणतीच भावना असणार नाही.

**– प्रवीण कुलकर्णी**





# डोह

संथ काळस डोहावर
हलके तरंग
मोहरणारे
मध्यजलावर
कमळ हसरे
खुलता खुलता
दरवळणारे.
काठचे दिवे
सामावणारे
झोकून देऊन
विरघळणारे.
उंच झुकले झाड
वाकून बघत
गंभीरपणे.
लांबच लांब
क्षितिज काळे
चकवणारे.

# कुपी

केसात चांदण्या जडल्या
अन भाळावरती चंद्र
वाऱ्याच्या झुळुकीत होते
संगीत कुणाचे सांद्र
मधुसूर तिथे तेव्हा
रेंगाळत अजुनी होते
सुखे जडावून धुंद
डोळे गहिरे होते
मादक त्या गंधाने
वेळ अचूक साधून
क्षण ठेवले तेव्हाचे
कुपीमध्ये बांधून
स्वरगंध मनी तेव्हा
धुंद गहिरे होते
तव रेशमी स्पर्शाने
फुटले धुमारे होते...

**– सुप्रिया वकील**





# तीस जानेवारी

बापू...
अजूनही आठवतंय
जानेवारीच्या तीस तारखेला
शाळा भरल्यानंतर
सायरन वाजायचा
आम्ही दोन मिनिटं शांत
बाहेर रस्ताही काहीसा
शांत व्हायचा...
आम्ही घरी विचारायचो...
'बाबा तुमच्या ऑफिसातही...'
ते 'हो' म्हणायचे
दोन मिनिटं
सगळा देशच
थांबतो, असं सांगायचे

बापू...
गेल्या बारा-पंधरा वर्षांत
पुलाखालून खूप पाणी गेलंय
तीस जानेवारीचा दिवस
फक्त 'मंथ एंड'पुरता
कधी काळी
साऱ्यांना शांत करणारे
सायरन आवाज हरवून बसलेत...
म्हणे आता त्यांची
बॅटरी डिस्चार्ज झालीय

जीव अर्धा होतो
ऑफिस गाठताना
जीव अर्धा होतो
सारं काही बांधलंय
घड्याळाच्या काट्यांशी
गाड्यांच्या 'हॉर्न'नं
सायरनचा आवाज
केव्हाच खाऊन
टाकलाय...

बापू
तुमच्यावर अशातच एक
पिक्चर आलाय
तुमच्या तत्त्वांची 'गिरी'
झालीय
तीन तासांत गांधी समजले,
असा भाव चेहऱ्यावर
आणून
तुमच्या तत्त्वांचा प्रसार
किती होतोय, हे सांगितलं
जातंय
आता तुम्ही एक
शो-मन झालात...
'ऑफिसा'च्या भिंतीवरून
'बॉक्स ऑफिस'वर
तुम्ही आता आहात
एक 'इव्हेंट...'
एसएमएस मागवून
नफा कमाविणाऱ्यांसाठी...





बापू...
तुम्हाला हे सारं
नवंच असंल
तुम्हीच तर म्हणाला होता,
खेड्यांकडे चला
इथं कुणाला वेळ आहे
अर्थशून्य प्रवास करण्यासाठी
पण तुमच्या संदेशाचा
आदेश करून
एक 'ग्लोबल व्हिलेज'
इथं वसलं आहे
इथं जगण्यासाठी
आलं पाहिजे
दुसऱ्याला मारायला
थेट रक्तपात कसला हो?
हे तर अहिंसेच्या मार्गानंच
आपणच असं जगायचं
की दुसऱ्याला जगणंच
अवघड करायचं...

बापू...
जगण्याची गणितं बदललीत
त्यामुळंच तीस जानेवारीला
इथली मनं आता
गलबलून जात नाहीत
दोन मिनिटं
एका ठिकाणी
थांबत नाहीत...

# संघर्ष

मध्यानीच्या किरणांचा
तप्त जीवघेणा श्वास
सावलीत जागा नाही
मज संध्येचीच आस

रखरखत्या उन्हात
एकटा काटेरी जीव
सावलीशी जाताना
माझीच मला कीव

हे जगणे उन्हासवे
का टाळती सारे?
आयुष्यात भरलेले
फक्त संघर्षाचे निखारे

संघर्षाचा यात्री
वाट उजाड थकलेली
का भेटतो येथे मला
माणसे सारे खचलेली?

संघर्षाच्या या वाटेला
कधीच कवेत घेतो
ती वाट बहरण्यासाठी
रक्त शिंपित जातो

– **श्रीपाद कुलकर्णी**





# आयचा घो (टाळा)...

सध्या आपल्या देशात कुणाचं राज्य आहे, या प्रश्नाचं एकच उत्तर येईल. ते म्हणजे घोटाळ्याचं राज्य आहे! जिकडं पाहावं तिकडं एखादा तरी घोटाळा झालेला दिसेल. कुठं स्पेक्ट्रमचा घोटाळा, कुठं क्रीडा स्पर्धेचा घोटाळा, कुठं आदर्श नावाच्या बिल्डिंगचा घोटाळा (नाव तरी काय नामी शोधलंय. व्वा!) ...कुठं रेशनच्या तांदळाचा घोटाळा, तर कुठं शाळेतल्या मुलांच्या खिचडीचा घोटाळा... कुठं पतसंस्थेचा घोटाळा, तर कुठं पटसंख्येचा घोटाळा... अशा सगळ्या घोटाळ्यांमुळं भारतातला सर्वसामान्य माणूस फारच हडबडून गेला. सदूचंही तसंच झालं. तोही गांगरला. अगदी भंजाळलाच म्हणा ना... त्याला या देशी रोगानं काही म्हणजे काही सुधरेना झालं... साधा चहा पितानाही तीनदा अंगावर सांडू लागला. संतापानं मुठी वळू लागल्या. पण बुक्का कुणाच्या पाठाडात घालावा, हेच कळेना झालं. जो तो आपला घोटाळ्यानंच गांजलेला दिसू लागला. मग हे घोटाळे करणारे कुठं उलथले, या प्रश्नाचा भुंगा त्याचं टाळकं पोखरू लागला. जगात एवढे सगळीकडे घोटाळे सुरू असताना आपल्याला एकही घोटाळा करता येऊ नये, याचं सदूला भयंकर वैषम्य वाटलं. सदूचं लग्न होऊन पाच-सहा वर्षे उलटली होती. त्याला एक पोरगीही झाली होती. एकूण त्याचं बरं चाललं होतं. पण तरीही आपल्या साध्या-सरळ आयुष्यात एकाही घोटाळ्याचा समावेश असू नये, ही खंत त्याला खाऊ लागली. अगदी त्याचं कजाग कलत्र दिवसरात्र त्याचं डोकं खायचं, तश्शी खाऊ लागली.

आपण एखादा तरी घोटाळा करून किमान आपल्या गल्लीत तरी फेमस व्हायचं, अशी तीव्र इच्छा सदूच्या मनात घुमू लागली. सदू बँकेत नोकरीला होता. त्यामुळं घोटाळा करणं अगदीच सोपं होतं. सदू मना बँक फ्रॉडचे मांडे खाऊ लागला; मात्र मांडेचा (सदूचा टेरर बॉस) चेहरा समोर येताच सदू गलितगात्र, गर्भगळित झाला. त्याच्या हाता-पायातलं त्राणच गेलं. मांडेसमोर आपण त्याच्या नजरेला नजर देत उभंही राहू शकत नाही, तिथं त्याच्या ब्रँचमध्ये फ्रॉड काय करणार कप्पाळ? आपल्याकडून एक रुपयाही इकडचा तिकडं झाला, तरी मांडे जरासंधासारखी आपली मांडी फोडून तिची दूर खेडेगावात ट्रान्स्फर केल्याशिवाय राहणार नाही, याची सदूला खात्रीच पटली. मग तो विचार बारगळलाच. सदूला समोरच्या फ्लॅटमध्ये राहणारी विनिता खूप आवडायची. घोडनवरी झाली, तरी तिचं अजून लग्न झालं नव्हतं. एक-दोन ब्रेक-अप झाले होते. मात्र सदूला चालणार होतं. (सदूच्या काकाचं काय जात होतं न चालायला?) तिच्याशी



अफेअर करून एक घरगुती घोटाळा करावा, असं अलीकडं सदूच्या फार मनात यायचं. त्यात विनिताही हल्ली येता-जाता, जिन्यात, लिफ्टमध्ये सदूशी जास्त गप्पा मारायची, लगट करायची. दुपारी अख्ख्या बिल्डिंगमध्ये कुणी नाही आणि विनितानं आपल्याला तिच्या घरी बोलावलंय असल्या दिवास्वप्नात सदू रंगून जायचा. मात्र एके दिवशी एका भरभक्कम पैलवानाशी विनितानं त्याची ओळख करून दिली आणि यांच्याशी ठरलंय, असं सांगितलं, तेव्हा सदूची उरलीसुरली आशाही संपुष्टात आली. आता त्याला ते 'दुपारी बिल्डिंगमध्ये कुणी नाही'वालं स्वप्न पाडून घेण्याचीही भीती वाटू लागली. सदूच्या स्वप्नांची अशा रीतीनं समाप्ती झाली. तरीही घोटाळा करण्याची त्याची हौस काही फिटत नव्हती. एकदा सदूनं डेअरिंग केलं. कार्पोरेशनच्या बसनं प्रवास करीत असताना तिकीट न काढताच प्रवास करण्याचा वज्रनिर्धार त्यानं केला. गर्दी

त कंडक्टरची नजर टाळून लपता लपता त्याची खूप दमछाक झाली. अखेर कंडक्टरनं त्याला तिकिटाचं विचारलं, तेव्हा तर सदूला मेल्याहून मेल्यासारखं झालं. तो नुसतंच पास, पास असं काही तरी तोंडात पुटपुटला. तेवढ्यात बस थांबल्याचं पाहून सदू घाईत उतरू लागला. मात्र त्याच्या राशीतले यच्चयावत सगळे वक्री ग्रह त्या वेळी एकत्र आले होते. खाली तिकीट तपासनीसानं सदूला पकडलं. उरलीसुरली लाज गेली. काय राव बँकेत काम करणारे लोक तुम्ही... तुम्ही पाच रुपयांसाठी हे धंदे का करता, असं वर परत ऐकून घ्यावं लागलं. मात्र सदू रोज पेपरमध्ये मोठमोठ्या घोटाळ्यांच्या बातम्या वाचत होता. एवढे हजार कोटी, तेवढे लाख कोटी... वगैरे आकडे त्यानं केवळ वाचलेच होते. कॅल्क्युलेटरवरही एवढे आकडे एकत्र बसत नाहीत, हे त्यानं पाहिलं होतं. आता घोटाळा कसा करावा, हे काही त्याला समजेना. अखेर एके दिवशी त्याच्या स्वप्नात साक्षात ए. राजा आले. पाठोपाठ कलमाडी, कनिमोळी, अमरसिंह वगैरे मंडळीही आली. या सगळ्यांनी सदूला गुरुमंत्र दिला. सदूच्या आयुष्याचं सोनं झालं. कारण... अहो, कारण दुसऱ्या दिवशी सदूनं नोकरीचा राजीनामा दिला आणि गल्लीच्या तोंडाशी एक गाळा घेऊन, क्लासचा बोर्ड लावला... सर्व घोटाळे करूनही कसे वाचाल? घोटाळ्यांतून मुक्ती कशी मिळवावी? त्वरित इलाजासाठी भेटा - प.पू. सदानंद महाराज घोटाळकर.

**– श्रीपाद ब्रह्मे**





# कोकणसाठी न उमजलेला ‘उद्योग’

सत्ताधारी म्हणतात, आम्ही म्हणू तेच प्रकल्प होणार. विरोधक आणि पर्यावरणवादी म्हणतात, प्रदूषणकारी प्रकल्प होऊच देणार नाही. कोकणवासीयांना रोजगारासाठी उद्योग हवेत तसेच सृष्टीसौंदर्य, पर्यावरण आणि त्यावर आधारलेले व आता अस्तित्वात असलेले पर्यटन, शेती-बागायती, त्यावरील पूरक उद्योगही हवेत. कोकणचे हे समाजमन राजकारण्यांना समजत नाही, की ते समजून घेत नाहीत हाच खराच प्रश्न आहे.

राज्याचे एक टोक असलेले आणि वर्षानुवर्षे विकासापासून दुर्लक्षित राहिलेले अशीच कोकणची ओळख. येथील सृष्टीसौंदर्य, निसर्गाने भरभरून दिलेलं देणं. वर्षानुवर्षे एखाद्या गुहेत मौल्यवान खजिना लपवलेला असावा, त्याप्रमाणे जगाच्या नजरेपासून दूर होतं. कोकणने देशाला अनेक मोठी, कर्तृत्ववान माणसे दिली. साहित्य, कला, संस्कृती याच जोडीने राजकारणातही अनेक जण चमकले; पण ते स्वतः मोठे होते गेले; मात्र कोकणला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी फारसे प्रयत्न केले नाहीत. याही स्थितीत कोकणवासीय समाधानी होते. कारण निसर्गाने या भूमीला इतके भरभरून दिले आहे की, त्याच्या जोरावर येथील रयतेला खाण्या-पिण्याची भ्रांत नव्हती. लोकांच्या अपेक्षाही माफक होत्या. गावात रस्ता यावा, शाळा व्हावी, गावचे मंदिर सुसज्ज व्हावे, एसटीची एखादी फेरी तरी यावी, अशा चौकोनी अपेक्षा होत्या. त्यासाठीच मंत्र्या-संत्र्यापर्यंत पाठपुरावा व्हायचा. गावातील मुंबईकर चाकरमानी यासाठी मंत्रालयाचे उंबरठे झिजवायचे. ज्याच्याकडे पुरेशी जमीन नव्हती, त्यांच्यासाठी मुंबई होतीच.

साधारण वीस वर्षांपूर्वीपासून विकासाचे वारे वाहू लागले. गावोगाव रस्ते, वीज, पाणी व्यवस्था पोहोचू लागली. १०० टक्के अनुदानातून फलोद्यान योजना आली. हजारो एकर जमिनीवर आंबा, काजूच्या बागा फुलल्या. कोकणवासीयांच्या खिशात पैसा खुळखुळू लागला. चाकरीसाठी मुंबई गाठणाऱ्यांचा ओघ कमी होऊ लागला.

डोंगरदऱ्यांतून रेल्वेची शिट्टी ऐकू येऊ लागली. साहजिकच विकासाच्या



अपेक्षा उंचावत गेल्या. येथील तरुण मंडळी उच्चशिक्षण घेऊ लागली. त्यांच्या नोकरीविषयीच्या अपेक्षा बदलल्या. हातात लेखणी, शिक्षण आल्यामुळे लाल मातीपासून ते दुरावत गेले. पूर्वीच्या चौकोनी अपेक्षांचे झाड आणखी डेरेदार झाले. रोज त्यांना नव्या शाखा फुटू लागल्या. घरात आलेली समृद्धी तोकडी पडू लागली.

नेमक्या याच वेळी साधारण सात ते आठ वर्षांपूर्वी कोकणात प्रकल्पांचे वारे वाहू लागले. अनेक गावांत खनिज उत्खनन प्रकल्प होणार असल्याचे वारे वाहू लागले. ४०-५० ठिकाणची लीजही जाहीर झाला. या पाठोपाठ ऊर्जा प्रकल्पांचे वारेही वाहू लागले. अपेक्षा वाढल्या असल्या, तरी त्यामागे वाहून जायची मानसिकता कोकणात नाही. येथील माणूस मुळातच हुशार आहे. ही समृद्धी कायम राखून त्याला विकास हवा आहे. येथील मातीवर, इथल्या निसर्गावर येथील माणसाचे आपल्या कुटुंबाइतकेच प्रेम आहे. ही माती वर्षानुवर्षे आपल्या पिढ्या पोसत आली आहे. याची जाणीव त्याला आहे. त्यामुळे या मातीची चिरफाड करून मिळणारा विकास कोकणवासीयांनी नाकारला. पर्यावरणपूरक रोजगार हवे, अशी भावना गावागावांतून मांडली जाऊ लागली. अशा कथित प्रदूषणकारी प्रकल्पांविरुद्ध गावागावांतून आंदोलने उभी राहू लागली. ठिकठिकाणी संघर्ष समित्या स्थापन होऊ लागल्या.

बदलता वारा बघून राजकारण्यांनीही यात हात धुऊन घ्यायला सुरवात केली. विरोधी पक्षांनी याचा 'इश्यू' केला. विरोधक उतरले म्हटल्यानंतर सत्ताधाऱ्यांनीही ताकद लावायला सुरवात केली. नंतर-नंतर यात लोकभावना, समाजमन बाजूलाच पडत गेले. निवडणुका आल्या की, याच विषयांवरून राजकारण झडू लागले. प्रदूषणकारी प्रकल्पांच्या मुद्द्यावरून अनेक नेत्यांनी अनेकदा कोलांट उड्या मारल्या. त्यामुळे लोकांना काय वाटते, हा मुद्दाच बाजूला पडला. या मुद्द्यावरून लोकांचा राजकारण्यांवरचा विश्वास उडू लागला. साहजिकच या आंदोलनाचा जोर कमी पडू लागला. असे असले तरी लोकांच्या भावना अजूनही बदललेल्या नाहीत. त्याचा विचार राजकारण्यांनी करण्याची गरज आहे.

लोकांना रोजगार हवा आहे. यासाठी येथे उद्योग यावेत, असेही येथील सर्वसामान्यांना वाटते; मात्र हे उद्योग आणताना सध्या अस्तित्वात असलेली अर्थव्यवस्था ढासळणार नाही, याचीही काळजी घ्यावी, अशी त्यांची अपेक्षा आहे. जिल्ह्यातील हजारो कुटुंबे आज नारळ, काजू, आंबा, सुपारी या पिकांमधून



मिळणाऱ्या उत्पन्नामुळे समृद्ध जीवन जगत आहेत. जागतिक स्तरावर वेगाने वाढणारा व्यवसाय असणाऱ्या पर्यटन क्षेत्रात जिल्हा भरारी घेत आहे. याचा परिणाम म्हणून कधी काळी मागास म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुदुर्गाचे दरडोई उत्पन्न सध्या राज्यात अव्वल आहे. कोणा राजकारण्याच्या कर्तृत्वाने हा टप्पा गाठला गेलेला नाही. यात येथील निसर्ग आणि पर्यावरणाचा शंभर टक्के वाटा आहे. ही समृद्धी उद्ध्वस्त करून दाखविली जाणारी विकासाची स्वप्ने कोकणवासीयांना नको आहेत. सह्याद्रीच्या रांगा पोखरून किंवा प्रदूषण निर्माण करून मिळणारे पैसे येथील लोकांना नको आहेत. सध्या अस्तित्वात असलेली संपन्नता आणखी वाढवावी, अशी येथील लोकांची अपेक्षा आहे. यासाठी कृषी, मत्स्य प्रक्रिया उद्योग, पर्यावरणाचे नुकसान होणार नाही, येथील शेती-बागायतीवर घाला येणार नाही, असे उद्योग पर्यटन याला चालना देतील, अशी येथील लोकांची अपेक्षा आहे. खनिजासाठी येथील डोंगररांगा पोखरल्या तर शेती-बागायती नाहीशी होईल. यामुळे निर्माण होणाऱ्या बेरोजगारीचे काय, असा प्रश्न कोकणच्या समाजमनात घोंघावतो आहे.

कोकणाला विकासाचे रोल मॉडेल बनविता येऊ शकते. यासाठी इथल्या पर्यावरणाचा वापर करून शाश्वत विकास साधता येऊ शकतो. यासाठी उद्योगविषयी स्वतंत्र धोरणाची गरज आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत येथील पीक पद्धती, भौगोलिक रचना, पाणी व्यवस्था, येथील मानसिकता वेगळी आहे. त्याचा विचार करून येथील उद्योग धोरण ठरविण्याची गरज आहे.

असे असले तरी सध्या मात्र कोकणात उद्योग विकासाबाबत तीन टोकाच्या तीन भूमिका आपापल्या जागेवर ठाम आहेत. सत्ताधाऱ्यांना ते म्हणतात तसाच विकास हवा आहे. यात लोकांच्या फायद्याच्या आवरणात खरा फायदा कोणाचा लपलाय, याची कल्पना कोकणवासीयांना आहे. विरोधक आणि पर्यावरणवाद्यांना सत्ताधारी आणत असलेले प्रकल्प घातक वाटतात. त्यामुळे त्यांचा याला टोकाचा विरोध आहे. यात विरोधकांचे राजकारण लपले आहे. या दोन्हीपासून दूर असलेल्या कोकणला संपन्नता, पर्यावरण आणि त्याच्या जोडीला उद्योगही हवे आहेत. हे सगळे मिळवायचे असेल, तर कोकणसाठी वेगळ्या उद्योग धोरणाची गरज आहे; पण हे समाजमन राजकारण्यांना समजत असूनही उमजत नसल्याची स्थिती आहे.

**– शिवप्रसाद देसाई**





# शिकार

कडुसं पडायला आलतं. मारुतीच्या देवळापुढल्या पिंपरणीच्या झाडावर पाखरं परतत हुती. जुनाट झाडाचं खोड अर्ध्यातंच किडलं हुतं. तरीबी ते अनेक वरसं घट्ट उभं हुतं. गलका उडला हुता नुस्ता पाखरांचा. चिमण्या, कावळं, भोरड्या अशा सगळ्यांचा संसार त्यावर थाटलेला. आयांच्या चाहुलीनं पिल्यांचा किलबिलाट सुरू झालता. चिलीम वडंत बसलेल्या गुरवानं शेवटचा झुरका मारला नि धुरानं दडपलेलं छातवाड मोकळं करीत बैठक सोडली. चूळ भरून त्यानं गाभाऱ्यातली पणती शिलगावली. बाहेर येईस्तोवर रामाप्पा आला. गुरवाला बरं वाटलं. रामाप्पाबरुबर जरा येळ जाईल, असा इचार करीत त्यानं खांबाला पाठ लावली. काय तर बोलणं काढावं म्हणून इचारलं, 'काय चाललंय आप्पा?'

'काय नाय गड्या' आप्पानं गुरवाकडं बघून न बघितल्यागत उत्तर दिलं.

'का आप्पा दुचित वाटतायसा?'

'काय नाय, मळीला डुकरांनी हायदूस घातलाय गा. मोळीच्या मोळी ऊस नासाडी व्हतीय रोज. कळप मोठा दिसतूय.' आप्पानं मन मोकळं केलं नि पुन्हा रस्त्यावर नजर लावली.

खरंच हुतं ते. डुकराच्या त्रासानं मळंकरी घायकुतीला आल्तं. डुयीबरुबर आलेल्या लावणीचा कडबा करीत हुती नुस्ती. एका-दोघांस्नी धडक दिवून जायबंदी केलं हुतं. त्यामुळं मळीला जायला गडीबी घाबरत हुतं.

'यवडी कशाला काळजी करता आप्पा. आज सकाळीच भीमाचं पाल पडलंय शाळंमागं. त्येला गाठून सांगू की, त्यो बंदोबस्त करील डुकरांचा...' गुरव.

आप्पाचा चेहरा फुलला आणि मग सरळ बसून तासभर गप्पा हाणल्या. भीमा आल्याच्या बातमीनं घोर मिटल्यासारखा आप्पा सैलसर झाला.

सकाळीच भीमाचं पाल शाळंमागं पडलतं. काळ्याकरंद पीळदार देहाचा नि शेलाटी कायंचा भीमा. बापही तसाच. दोघांचीही नजर भाल्याच्या टोकावानी धारदार. बघणारा टरकायचाच. भीमाची आई आणि बायकू, आठ-दहा कुत्री



आणि दोन गाढवं असा जिव्हाळा. कुत्रीही भयंकर ताकदीची. जनावर कितीही ताकदीचं असू दे. दोघांनी कान धरला की जनावर जागंचं हालायचं नाही. तावडीत सापडलं की मागचं दोन पाय रोवून कुत्री त्याला जायबंदी केल्याशिवाय हाटायची नाहीत.

भीमानं उठल्या उठल्या सगळं आवरलं. जरा तुकडा मोडला. पालापलीकडच्या देवीला हात जोडलं नि झिपऱ्याची दोरी सोडली. तसं सगळ्या कुत्र्यांनी अंग झाडलं. झिपऱ्या भीमाचा वाघासारखा कुत्रा. भयंकर ताकदीचा. भीमाबरुबर सुऱ्या, पक्या, मिल्या, सुन्या आणि दत्ता म्हाताऱ्याबरुबर कोण कोण सामील झाली. भीमा आणि त्याच्या कुत्र्याच्या कळपानं बिचकलेल्या गावातल्या कुत्र्यांनी नुसता कालवा उडवून दिला. हातातल्या लांबलचक भाल्याच्या काठीचा बुड आपटत भीमा काय न बोलता गुमान चालत ऱ्हायला.

रामाप्पाच्या बांधावर चालता चालता भीमा एकदम काय तर चावल्यासारखा थांबला. तशी सगळीच बिचकून थांबली. ओलसर रानातलं ठसं भीमानं न्याहाळलं. 'मोठ्ठं दिसतंय जनावरं आणि कळपबी दिसतूय..' भीमा पुटपुटला. तशी सगळी सावध झाली. भीमानं चार टिंगरी कुत्री सोडून दिली. गुहेत सरपटत जाणाऱ्या नागासारखी कुत्री आत गेली आणि उसात हालचाल जाणवली. काडकाड आवाज झाला. जनावर हितंच हुतं. सगळं गडी सावध झालं. भीमानं झिपऱ्याला सोडलं. तोपर्यंत उसात्नं जनावर बाहेर पडलं. टिंगरी आणि झिपऱ्यानं पायाला भिंगरी लावली. गड्यांनी हाकाऱ्या घालायला सुरवात केली. 'धर, धर....घावलं बघ रं घावलं.... आरं हाण...' आरोळ्या नि गलका उठला नुसता. कुत्र्यांमागं भीमाही पळत हुता. चपळ चित्त्यावाणी भीमा पळत हुता. त्येच्या पायात वीज संचारली हुती. हातात रोखलेला भाला आणि सावजावर तीक्ष्ण नजर.

कुत्र्यांनी जिवाचं रान करीत डुकराचा पाठलाग चालविला हुता. पूर्ण वाढलेलं जनावर बाकी त्यांच्या टप्प्यात येईना. जनावर उसात्नं जे उठलं ते थेट गवत कापलेल्या मैदानावरनं बेभान हुवून छाती फुटस्तोवर पळंत हुतं. रिकाम्या रानात धुरळा उडत हुता. दंग्यानं रानातला प्रत्येक जण सावध झाल्ता. जवळपास अर्धा तास हा भयंकर प्रसंग चालला हुता. डुकराला सवड मिळाली तसं ते दुसऱ्या फडात शिरलं. कुत्री आत शिरणार तोच भीमानं हाळी दिली. धापा टाकत नि हातभर जीभ काढत कुत्री फडाबाहेरच थांबली.

फड दहा-बारा सरीचाच हुता. भीमानं नवा डाव आखला. सगळ्यास्नी



खुणावलं. झिपऱ्याला घिवून हळूच आत शिरला. बाकीचं गडी बाहेरच राह्यलं. तिसऱ्या सरीत भीमा झिपऱ्यासह दबा धरून बसला. भीमाचा चेहरा फुललेला हुता. शिकारीचा खात्मा करायचा त्यानं हिय्या केला हुता. धा-बारा मिनटं कसलीच हालचाल झाली नाही. जरा वेळानं कुत्रं बिचकून उठलं. कान टवकारलं. मान लांब करून काही तरी हुंगल्यासारखं करीत त्यानं समोर नजर रुतवली. त्यासरशी भीमा सावध झाला. जनावर सरीत्नं हळूहळू पुढं सरकत हुतं. कुत्र्याला त्याचा वास आला हुताच. भीमाला ही संधी हातची जावू द्यायची नव्हती. भीमा कुत्र्यांकडं बघत हळू आवाजात कायतरी पुटपुटला. त्यासरशी कुत्रीही शांत झाली. भीमाची हालचाल टिपत त्याच्या इशाऱ्याची वाट बघू लागली. त्यानं भाला हातात घेतला. जनावर नीट सरीत यायची वाट बघत तो चवड्यावर मुरुन बसला. जनावरही मोठं बिलंदर. त्येबी एका बाजूला कलत आवाज न करता पुढं पुढं सरकत हुतं. शेवटी ते नजरेच्या टप्प्यात आलंच. त्यासरशी भीमानं झाप्पदिशी भाला फेकला. गच्च सरीत्नं 'सुाााई...फाड्..फाड' करीत भाला डुकराच्या कानात पाच्चदिशी रुतला. रक्ताची उंच धार उडाली. जिवाच्या आकांतानं उसाचा कडबा करीत ते भलं मोठं जनावर जीव वाचवण्यासाठी पळत सुटलं. भीमानं कुत्र्यास्नी हाक दिली. एकटाक सगळी कुत्री तावदारुन भयंकर गलका करीत त्याच्यामागं धावत राहिली. भीतीनं जनावर जास्तच पळत सुटलं नि थोड्या अंतरावर जावून धाडदिशी कोसळलं. सगळ्या कुत्र्यांनी त्याला गराडा घातला. भीमा आल्यावरच त्यांनी जागा सोडली. शिकार फत्ते झाल्ती. सगळं गडी एकत्र आलं तरी ते धूड उचलणारं नव्हतं. रामाप्पाच्या गाडीत्नं ते जनावर भीमाच्या पालाम्होरं आणून टाकलं. त्या पंधरवड्यात मळीतल्या डुकरांचा भीमानं नि त्येच्या कुत्र्यांनी खात्मा करुन टाकला. मळंकरी आता बिनघोर झाल्तं. भीमा त्यांच्यासाठी देवासारखा धावून आला हुता.

**– कुमार कांबळे**





## कोणताही रक्तगट

रक्तपेढीच्या काउंटरवर एक तरुण आला आणि त्याने एक बाटली रक्ताची मागणी केली. काउंटरवरील माणसाने विचारले, 'कोणता गट?'

'कोणताही रक्तगट चालेल.'

'असं कसं चालेल?'

'का नाही? मला माझ्या प्रेयसीला रक्ताने पत्र लिहायचंय.'

## बाहेरचं खाऊ नका

बंडू हॉटेलात गेला आणि त्याने मसाला डोसा मागितला. वेटरने मसाला डोसा आणून दिला. नंतर बंडूने सामोसा मागितला. वेटरने तोही आणून दिला; पण वेटरला आश्चर्य वाटले. कारण बंडूने फक्त मसाला खाल्ला आणि डोसा तसाच ठेवला. समोशाचे सारण खाल्ले आणि आवरण तसेच ठेवले. वेटरने

उत्सुकतेने बंडूला कारण विचारले.

बंडू म्हणाला, ''माझी तब्येत बरी नाही. म्हणून डॉक्टरांनी बाहेरचं काही खाऊ नको असं सांगितलंय.''

## वाघाची भीती कोणाला?

दोन मित्र जंगलात फिरायला गेले होते. अचानक त्यांच्यासमोर वाघ उभा ठाकला. एका मित्राने प्रसंगावधान राखून वाघाच्या डोळ्यात माती फेकली. वाघ बिथरला आणि गोंधळला.

तो मित्र दुसऱ्याला म्हणाला, 'चल पळ लवकर.'

दुसरा मित्र म्हणाला, 'मी का पळू. त्याच्या डोळ्यात तूच माती टाकलीयस.'


## कुटुंब नियोजन

कुटुंब नियोजनाचा प्रचार करण्यासाठी खंडूने आपल्या रिक्षावर लिहिले होते, 'हम दो हमारा एक. छोटा परिवार सुखी परिवार.'

या संदेशांच्या खालीच लिहिले होते : चिंकू, पिंकू, रिंकू, टिंकू, राणी, डॉली आणि खंडू परिवार

**– मुकुंद फडके**





# कावळ्याच्या माथ्यावर...

धामधूम चालविलेल्या पावसाने हळूहळू काढता पाय घेण्याचे संकेत दिले आणि आळसामुळे मोड फुटायला आलेल्या आमच्या पायांना भटकंतीचे वेध लागायला लागले. निघायचं म्हटल्यावर लगेच निघणं काही होत नाही हा आमचा अनुभव फार कामी आला. आज-उद्या-परवा करता करतही काही काळ लोटला. काही ना काही अडचणी येत होत्या आणि बाहेरच्या निसर्गाचं आमंत्रण जणू अव्हेरत असल्याप्रमाणे आम्ही पुण्यातच ठाणबंद होतो. अखेर ऑक्टोबरात एकदाचा तो सुमुहूर्त मिळाला. कोण येतंय कोण नाही याचा विचार न करता मी मोसावरून सटकायचा बेत जाहीर केला आणि लगेच आमचा एक खास भटक्या मित्र एका उडीत यायला तयार झाला. वरंधा घाटातून ताम्हिणी घाटातून परतायचं असा ब्येत पक्का केला आणि एका रविवारच्या पहाटे मोसाला किक् मारून आम्ही सुटलो.

भल्या पहाटेचा थंड वारा हेल्मेटमधूनही सुखावत होता. कात्रज बायपासवरून बोगद्याकडे जाताना येणाऱ्या दरीपुलावर हमखास सूर्योदयाला सामोरे जाण्याचा आमचा परिपाठ या वेळीही पाळला गेला. डावीकडून सूर्याची कोर हळूहळू वर येऊ लागली आणि पुलावर मोसा आपोआपच थांबली. त्या तेजोभास्कराचे कोवळे सोनेरी किरण आसमंताला उजळू लागले आणि न कळत हात जोडले गेले. निसर्गाचे कितीतरी अनमोल नजराणे अक्षरशः फुकट पदरात पडत असतात. फक्त आपले डोळे उघडे हवे! उबदार हवेत गाडीने वेग पकडला आणि बोगदा



पार पडला. शिवापूर सामारं येऊ लागलं. ठरलेल्या अड्ड्यावर गरमगरम मिसळ-चहासाठी थांबणं अपरिहार्य होतं. लालभडक तर्री मारलेली मस्त मिसळ, त्याच्याबरोबर लुसलुशीत पाव आणि पोळलेल्या जिभेला वर चहाचा चटका देऊन आम्ही हुषार झालो. आता दिवसभरात अन्नब्रह्म मिळालं नसतं तरी वांदा नव्हता.

ठरल्याप्रमाणे भोर फाट्याला वळालो आणि सुटलो. डावीकडे निरेची साथ होती. भोरचा छोटासा घाट सुरू होताना नदी एक मस्त वळण मारते आणि तमाम हौशे, नवशे आणि गवशे फोटोग्राफर या स्पॅटवर थांबून आपल्या कलेला न्याय देतात. (माझ्यासारखे न्याय देण्याचा प्रयत्न करतात!). तर तो सोहळा आटोपला आणि निघालो. भाटघर धरण मागे टाकत, यष्टी स्टँडला उजवीकडे ठेवत वरंधा घाटाच्या रस्त्याला लागलो. गाव मागे पडल्यावर निसर्गाचा भन्नाट कॅनव्हास समोर पसरलेला दिसला. डावी-उजवीकडे हिरवळलेल्या डोंगररांगा, मध्येच खळखळणारे पाण्याचे प्रवाह, पोपटी भातशेती, त्यातलं लाल पाणी आणि सरळ समोर जाणारा काळाशार रस्ता. या परिसरात भटकताना एकदा भारद्वाज पक्ष्याच्या फोटोसाठी लैच पळापळ करावी लागल्याचा अनुभव आहे.

वरंधा घाट म्हटल्यावर बहुतेकांना आठवतो तो भजी पॉईंट आणि तो पाऊस. पण या घाटात एक किल्लाही आहे. त्याचं नाव कावळा. भजी पॉईंटच्यावर एक देवस्थान आहे. ते आहे वाघजाई. हा किल्ला आणि ते देवस्थान पाहायचं आम्ही ठरवलं होतं. निरा-देवघर धरण मागे टाकत, वळणांना सामोरे जात आम्ही जात होतो. सभोवताली अनेक डोंगर आणि त्यांची शिखरं डोकावत होती. पण कावळा किल्ला आहे भजी पॉईंटजवळ. यथावकाश पोहोचलो. पॉईंटच्या नावाला जागून भजी हाणली आणि वर चहा. मग केली कावळ्याची चौकशी. पॉईंट ओलांडून पुढे गेल्यावर उतरणीच्या वळणावर उजवीकडे डोंगराचा एक भाग पोट काढून पुढे आला आहे. तेथे काही पायऱ्याही दिसतात. हाच गेट वे पॉईंट टू कावळा! गाडी





लावली आणि निघालो. प्राचीन काळी किल्ल्याची वाट बहुदा वाघाजाईवरून असावी. आता घाट झाल्यामुळे डोंगर मधोमध कापला गेला आहे. आताची वाट चालणाऱ्यांची 'वाट' लावणारी आहे. ऑक्टोबर सुरू झाल्याने पिवळ्या पडायला लागलेल्या गवतामुळे वाट आणखी घसरडीही झाली होती. उजवीकडे आत गेलेला डोंगराचा भाग आणि डावीकडे दरी. त्यातून जाणारी निसरडी चिंचोळी वाट किल्ल्याकडे नेते. सभोवताली झाडोरा पसरला होता. सटकून पडताना त्या झाडांचा आधार होता. चालत होतो खरे; पण समोरून कोणी नाही आणि मागेही कोणी नाही. भरपूर पदयात्रा झाल्यावर अचानक माचीसारखा भाग आला. काही पडके अवशेष वगळता गडावर पक्के बांधकाम काही नाही. पाण्याची काही कोरडी टाकी दिसली, काही टाक्यांत शेवाळलेले पाणी होते.

उंच वाढलेल्या गवतातून पायवाट मुश्किलीनेच कळत होती. वर काहींची शेती असल्याचं पॉईंटवरच्या मामांनी सांगितलं होतं म्हणून परत पुढे निघालो. पायवाट निसरडी आणि गवतात हरवलेली. घवतात बुडत, तसेच झुंजत पुढे गेलो. काही पडके अवशेष दिसले. मग आलं एक उंच टेकाड. त्यावरून जाऊन किल्ल्याचं टोक पाहायचा बेत होता. पण टेकाड सरळसोट; पाऊल काही ठरेना. सभोवतालचा निसर्ग मात्र अप्रतिम होता. सूर्य कलायला लागला होता. त्या ओसाड किल्ल्यावर फक्त आम्हीच. अखेर फार हुषारी न करण्याचं ठरवून परत निघालो. येतानाची वाट उतरणीची. त्यात पावसाळा संपल्यामुळे दगड शेवाळलेले. कसरत करत पावलं टाकत होतो. पुन्हा एकदा बाहेर पडून पॉईंटकडे गेलो. चहा घेत असताना मामांना आम्ही किल्ल्यावर जाऊन आल्याचं समजलं. या दिवसांत गवतात साप असल्याचं त्यांच्या बोलण्यात आलं आणि आम्ही जरा उडालोच. त्या शांत किल्ल्यावर माजलेल्या गवतात सापवगैरे असू शकतील हे आमच्या डोस्क्यांत शिरलंच नव्हतं! केवळ वरच्याची कृपा म्हणून त्यातल्या कोणी आमच्याकडे नजर टाकली नव्हती... काही क्षण गप्प बसलो आणि मग वाघजाईची चौकशी केली.

वरंधा घाटात दिसणाऱ्या उंच कड्यांवर वाघजाई आहे. वर जाण्याचा रस्ता जरा कसरतीचा आहे. गेलो. वर एक साधं देऊळ आणि आत देवी. वरून दिसणारा देखावा केवळ सुंदर! वर पाण्याचं टाकंही दिसलं. पूर्वी या देवळावरूनच किल्ल्याची वाट असावी हे कळत होतं. परत उतरलो, चहा ढोसला आणि कावळ्याकडे नजर टाकत रस्ता सुधरला.

घाटातून माझेरीकडे उतरल्यावर उजवीकडे शिवथर घळीला रस्ता जातो.



न वळता गेलो, तर सरळ मुंबई-गोवा हमरस्ता गाठता येतो. याच रस्त्याला डावीकडे वळालो, तर कांगोरी ऊर्फ मंगळगडालाही जाता येतं. पायाचा स्टॅमिना चेक करायचा असेल, तर पावसाळ्यात मंगळगडावर जाऊन यावं असं आमचं मत आहे. (तोही अनुभव घेतलाय!). आम्ही सरळ गेलो आणि महाडकडे वळालो. आता दुपार टळून गेली होती. लोणेरेला थांबून मस्त पोटपूजा केली आणि माणगाव गाठलं. आता ताम्हिणी घाट समोर येणार होता. तिन्हीसांजा होऊन गेल्या होत्या. सभोवतालच्या डोंगररांगा आकारांमुळे कळत होत्या. घाटात शिरलो तेव्हा काळोख पसरला होता. रस्ता वाईट होता. खड्डे चुकविताना हाल होत होते. पण मोसाला असलेल्या दोन जादा दिव्यांमुळे ताण जरा कमी झाला. घाट चढून वर आलो. वरच्या हॉटेलात गरम चहा मारला आणि पुन्हा सुटलो. पाहता पाहता मुळशी आलं आणि मागे पडलं. पौडला काही क्षण थांबलो. आता थंडी चांगलीच जाणवायला लागली होती. पण थांबून चालणार नव्हतं. प्रवासाचा अखेरचा टप्पा नेहमीच जाणवतो. दिवसभरातली वणवण अंगावर यायला लागते. रेटून हा टप्पाही पार केला. बावधन चौकात आलो आणि पुण्याचे दिवे लखलखताना दिसले. सहजच स्पिडोमीटरकडे नजर टाकली, तर गाडीचं आज दिवसभराचं रनिंग तीनशे किलोमीटरच्या पलिकडे दिसत होतं... आजचा दिवस मस्त गेला होता आणि आताची वाट घराकडे नेणारी होती...

(ही भटकंती दोन वर्षांपूर्वीची असल्यामुळे काही तपशील मागे-पुढे होण्याची शक्यता आहे. चूभू द्यावी-घ्यावी हे तो प्रेमाची विनंती!)

**- उदय हर्डीकर**







# मनस्वी कलावंत!

कलेचा प्रवास धुंद, त्यामधला कैफ मनाला मोहवणारा. पैसा, प्रसिद्धी, यश, कीर्ती, मानसन्मानाच्या होडीतून पुढे सरकणारा. प्रतिभेचा धूप जाळणाऱ्या मनस्वी कलावंतांच्या जीवनाचं मंथन करताना अनेक यातना, मानभंग, नशिबाची हुलकावणी...असं सारं पेलून एक कृतार्थ जीवन जगलेला कलाकार...जगजित सिंग.

आवाजातील खर्ज, धीरगंभीरता थेट हृदयाला भिडणारी. याच भांडवलावर त्यांनी गगनभरारी घेतली. रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. खरंतर या माणसानं 'गझल' रसिकांच्या मनामनांत रुजवली. गझल ऐकायला भाग पाडलं. सामान्य माणसाला गझलेचा आनंद लुटणं केवळ जगजितसिंग यांच्यामुळं शक्य झालं, अस म्हटल्यास वावगं ठरू नये. आपल्या गझलांमध्ये बारा तारांचे गिटार आणि बेस-गिटारची ओळख या असामान्य कलाकारानं करून दिली. प्रणय, आर्तता, व्याकूळता, हुरहूर, निराशा, सफलता असे भाव सहजतेने आपल्या गझलांतून मांडून ते थेट लोकांच्या हृदयांपर्यंत जगजित यांनी नेले. म्हणूनच गझल लोकांना समजायला सोपी झाली. साठ-सत्तरच्या दशकांत गझलचे बादशहा असलेले मेहंदी हसन, बेगम अख्तर, तलत मेहमूद यांची गझल ऐकणे म्हणजे उच्च दर्जाचे समजले जायचे. त्यांची गझल म्हणजे 'उँचे लोक उंची पसंद' अशीच असायची. खास लोकांसाठी या मैफिली जमायच्या; पण याच काळात जगजितसिंग सारखा तारा गझल गायकीत उतरला. त्यांनी पहिलं काम केलं ते गझलचे शब्द सोपे करून मांडले. हृदयाला चटकन भिडणारे शब्द, त्याच्यातील स्पंदने, आनंद भाव, कारुण्य यांचा समतोल साधत गझलेचं पात्र रुंद केलं. शास्त्रीय संगीताचं उत्तम ज्ञान असतानाही त्यांनी ख्याल, ध्रूपद, ठुमरीचं शिक्षण घेतलं; पण त्या गायकीत न अडकता गझलची अवघड पायवाट निवडली. सुरवातीच्या काळात अत्यंत खडतर दिवस काढताना अनेक यातनांना सामोरं जावं लागलं. कामासाठीची वणवण चुकली नाही. कित्येक कटू अनुभवातील दर्द पुढे त्यांच्या अनेक गझलांतून उतरला. आपल्या गझलेनं, दर्दभऱ्या आवाजानं मैफिलींचा आणि सिनेमाचा परिसर उजळून काढणाऱ्या या कलाकाराच्या जीवनात 'चित्रा'नं आयुष्यभरासाठी अनेक स्वप्नांची चित्रे रेखाटली. उमेदवारीच्या काळात जगजितना मोलाची साथ देणारी पत्नी, सखी, मैत्रीण यांसारख्या नात्यांनी 'चित्रा'नी संसारामध



ये बहर आणला. जगजितसिंग यांच्यासमवेत ‘चित्रा’नी अनेक ‘स्टेज शो’ केले; पण प्रतिभेच्या वरदानानं आणि आपल्या गायकीनं आसमंत दीपवून टाकणाऱ्या या कलाकारांचं सुख नियतीला पाहावलं नाही. डोळ्यादेखत त्यांच्या तरुण मुलाचा मृत्यू झाला. या दांपत्याला क्रूर नियतीनं जबरदस्त धक्का दिला. कलावंतांच्या आयुष्याला कुठेतरी नजर लागतेच, हे मात्र दैवानं पुन्हा एकदा सिद्ध केलं. मुलाच्या अकाली जाण्यानं ‘चित्रा’ मोडून पडल्या; पण आपलं गहिरं दुःख जगाला न दाखवता जगजित गातच राहिले ‘चिठ्ठीना कोई संदेश, ना जाने कौनसा देस, तुम चले गये....’. आपल्या वेदना त्यांनी गझलेतून जिवंत केल्या. आवाजातील ‘दर्द’च जगजित यांच्या साथीला अखेरपर्यंत राहिला. चित्रपटांतून गझल घराघरांत पोचविणाऱ्या या मनस्वी कलंदराचे गझलचे साठ अल्बम प्रसिद्ध झाले आहेत. गझलक्षेत्रातली ही मोठी झेप फक्त जगजितसिंग यांच्यामुळे शक्य झाली. जीवनातील अनेक टप्पे पार करून जगजित या गझलसम्राटाने आयुष्याचा पैलतीर गाठला, तो आपल्या ‘एक्झिट’ने. दुःखाला, चैतन्याला, आर्ततेला, व्याकूळतेला स्वर देणाऱ्या या कलावंताच्या गझलांच्या सावल्या आपल्याला निश्चितच दूरपर्यंत साथ देत राहतील हे मात्र नक्की!

- जगदीश जोशी





# ‘घंटा’ म्हणजे काय रे भाऊ?

एक ट्रिलियन म्हणजे किती? म्हणजे एकावर किती शून्ये? येतय सांगता? ...थांबा थांबा हजार कोटी किंवा शंभर अब्ज असे एकक वापरून सांगायचे नाही. भारतीय दशमान पद्धत वापरून अथवा मराठी शब्द वापरून सांगायचे... विचार करा.... जमतंय का?

नाही जमत ना. मग एकावर पन्नास शून्ये किंवा एकावर शहाण्णव शून्ये म्हणजे किती हे सांगताच यायचे नाही... मग अशा संख्यांचा उच्चार तरी कसा करायचा. पण भारतीय अंक गणितात याला उत्तर आहे...

अतिप्राचीन भारतात गणितावर बरेच संशोधन झाले आहे. त्याबाबत विश्वकोशात दिलेल्या माहितीनुसार, प्राचीन काळातील भारतीयांनी गणितासाठी वापरलेल्या चिन्हांना अंक म्हटले आहे. हेच अंक म्हणजे (एक ते नऊ आणि शून्य) सध्याच्या दशमान पद्धतीचे जनक आहेत. आर्यभट्ट यांनी शून्याचा शोध लावला. शून्य ही भारताची जगाला देणगी आहे. ‘आसा’ या वैदिक काळाच्या प्रारंभी असलेल्या वायव्य भारतात राहणाऱ्या भारतीय गणितज्ज्ञांनी सर्वप्रथम दशमान पद्धतीची संकल्पना मांडली. अंकाच्या स्थानानुसार त्याची किंमत बदलेल या ‘आसा’ यांनी मांडलेल्या संकल्पनेतून जगाला अंकलेखनाच्या दशमान पद्धतीची देणगी मिळाली. अशा पद्धतीने लिहिलेले आकडे हिंदासा नावाने ओळखले जाऊ लागले. साधारणतः इसवी सन ५०० मध्ये आर्यभट्टांनी दशमान पद्धती सगळीकडे रुजविली. त्यांनी शून्यासाठी ‘ख’ या शब्दाचा वापर केला. नंतर त्याला शून्य असे संबोधले गेले.

इंग्रजीत संख्यांना सलग संज्ञा नाहीत. थाऊजंड, मिलियन, बिलियन, ट्रिलियन, क्वाड्रिलियन अशा एक हजाराच्या पटीतील संख्यांनाच संज्ञा आहेत. भारतीय पद्धतीतही दहाच्या सतराव्या घातापर्यंतचे अंक अनेकदा ऐकिवात असतात. म्हणजे खर्व, निखर्व, पद्म, महापद्म अगदी परार्धापर्यंत. (अर्थात फक्त नावे ऐकून आहोत, नेमकी संख्या त्यानुसार सांगणे शक्य होत नाही कारण त्याची आपल्याला सवयच नाही).

विविध कोशांमध्ये किंवा पुस्तकांत भारतीय दशमान पद्धतीनुसार आकडे





**खालील प्रमाणे लिहिले जातात-**

१ - एक
१०- दहा
१००- शंभर
१००० - हजार
१०,००० - दहा हजार
१०,००,०० - लाख
१०,००,०००- दहा लाख
१,००,००,००० - कोटी
१०८ - दहा कोटी
१०९ - अब्ज
१०१० - खर्व (दश अब्ज)
१० ११ - निखर्व
१०१२ - महापद्म
१०१३ - शंकु (नील)
१०१४ - जलधी (दशनील)
१०१५ - नत्य
१०१६ - मध्य
१०१७ - परार्ध (शंख)

आता ही पुढील संख्या किती सांगता येईल का? प्रयत्न करून पाहा...

१०००००००००००००००००००००००००००००००००००० ०००००००००००००००००००००००००००००००००००००० ००००००००००००००००००००००.

ही संख्या आहे दशअनंत... एकावर शहाण्णव शून्ये...

पण ही संख्या मोजायची कशी? भारतीय पद्धतीत त्याचेही उत्तर आहे. अर्थात ते शब्द आता वापरात नाहीत. या शब्दांची सूची कोणत्याही पुस्तकातही आता उपलब्ध नाही. काही जुन्या पुराण्या पुस्तकात त्याचे संदर्भ आहेत. अशीच एक सूची माझ्या मित्राला मिळाली, त्याने ती मला दिली. एका पुस्तकाचे ते पान होते, त्यात पुस्तकाचे नाव नाही, मात्र शेवटी अंमळसिद्धी असा उल्लेख आहे. या सूचीतील नावे आणि आणि वरील सूचीतील नावे यात थोडा फरक आहे. यातील काही नावे ऐतिहासिक, पौराणिक कथांमधून कानवर पडली असतील.



यात थोडेसे जरी तथ्य आहे असे मानले तर, आपल्या पूर्वजांकडे प्रचंड संपत्ती होती व ती मोजता येत होती, त्यासाठी पद्धती होती.

**पाहा ही सूची.....**

एकं (एक), दशं (दहा), शतम् (शंभर), सहस्त्र (हजार), दशसहस्त्र (दहा हजार), लक्ष (लाख), दशलक्ष, कोटी, दशकोटी, अब्ज, दश अब्ज, खर्व, दश खर्व, पद्म, दश पद्म, नील, दशनील, शंख, दशशंख, क्षिती, दश क्षिती, क्षोभ, दशक्षोभ, ऋद्धी, दशऋद्धी, सिद्धी, दशसिद्धी, निधी, दशनिधी, क्षोणी, दशक्षोणी, कल्प, दशकल्प, त्राही, दशत्राही, ब्रह्मांड, दशब्रह्मांड, रुद्र, दशरुद्र, ताल, दशताल, भार, दशभार, बुरुज, दशबुरुज, घंटा, दशघंटा, मील, दशमील, पचूर, दशपचूर, लय, दशलय, फार, दशफार, अषार, दशअषार, वट, दशवट, गिरी, दशगिरी, मन, दशमन, वव, दशवव, शंकु, दशशंकु, बाप, दशबाप, बल, दशबल, झार, दशझार, भार, दशभीर, वज्र, दशवज्र, लोट, दशलोट, नजे, दशनजे, पट, दशपट, तमे, दशतमे, डंभ, दशडंभ, कैक, दशकैक, णित, दशअमित, गोल, दशगोल, परिमित, दशपरिमित, अनंत, दशअनंत.

कोणी आपल्याला विचारले की तुझ्याकडे किती पैसे आहेत? आपण सहजपणे उत्तर देतो पैशांच्या नावाने 'शंख' आहे किंवा 'घंटा'... त्यावर समोरचा आपल्यावर हसतो व त्यावर विश्वास ठेवत नाही... कारण कळलं ना... शंख किंवा घंटा म्हणजे खूऽऽऽऽऽप पैसे.

**- सुरेंद्र पाटसकर**



# नेटवर्किंगच्या विश्वात

इंटरनेट क्षेत्रातील बदलामुळे जगभरातील कोणतीही माहिती एका सेकंदात उपलब्ध होऊ शकते; मात्र गेल्या काही दिवसांपासून सोशल नेटवर्किंगचा वापर युवा पिढीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. वापरामागे विविध कारणेही आहेत. यामुळे अपडेट राहायला मदत होते. शिवाय, नवनवीन माहिती मिळण्यास मदत होते. नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे सोशल नेटवर्किंगचे जेवढे फायदे तेवढेच तोटेही. मात्र इंटरनेटच्या फायद्या-तोट्याचे गणित अनेकांना अद्याप समजलेले नाही. सोशल नेटवर्किंगच्या अतिरेकामुळे वेगवेगळ्या प्रकारचे मानसिक आजारही होत असतात. कोणत्याही गोष्टीचा अतिरेकी वापर हे व्यसनच असून, योग्य वेळी थांबवणे गरजेचे आहे.

सोशल नेटवर्किंग म्हणजे नेमके आहे तरी काय? असा प्रश्नही अनेकांसमोर उभा राहतो. इंटरनेटचा वापर हा सोशल नेटवर्किंगसाठी सर्वाधिक वापरला जातोय. सोशल नेटवर्किंगला भारतातल्या इंटरनेट युजरकडून सगळ्यात जास्त प्रतिसाद मिळतो. त्यामुळेच 'गुगल' ही सोशल नेटवर्किंगमध्ये आघाडीवर असलेली कंपनी प्रथम भारतातल्या युजरचा विचार करते. सोशल नेटवर्किंगसाठी फेसबुक, ट्विटर, एफबी, ऑर्कूट, चॅटिंग असे अनेक पर्याय युजर्सपुढे उपलब्ध आहेत. इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, भारतातला ७५ टक्के युजर हा ३५ वर्षांच्या आतील वयाचा आहे. भारतातील युजर इंटरनेटसाठी आठवड्याला किमान साडेबारा तास वेळ देतात. दिवसातले अनेक तास इंटरनेटवर घालविणाऱ्यांची संख्याही मोठी असून, दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

ट्विटरमुळे अनेक जण सेकंदा-सेकंदाला आपली वैयक्तिक माहिती अपलोड करताना दिसतात. शिवाय यू-ट्यूबच्या माध्यमातून अनेक व्हिडिओ अपलोड करता येत असल्यामुळे दर सेकंदाला ठिकठिकाणचे व्हिडिओ अपलोड होताना दिसतात. जगात कोणतीही घटना घडली तरी काही वेळातच त्याचे व्हिडिओ यू ट्यूबर उपलब्ध होतात. सोशल नेटवर्किंगच्या प्रभावी माध्यमामुळे अनेकजण इंटरनेटच्या सतत संपर्कात राहतात. माहिती तंत्रज्ञानातील बदलामुळे मोबाईलमध्येही अनेक बदल झाले आहेत. सोशल नेटवर्किंगच्या सेवा





मोबाईलमध्ये उपलब्ध असल्यामुळे, अनेक जण मोबाईलद्वारे इंटरनेटचा वापर वाढत चालला आहे.

इंटरनेटसारख्या माध्यमामुळे अगदी मोकळेपणाने युजर्सला आपली मते समोरच्या व्यक्तीसमोर मांडता येतात. शिवाय, माहितीची देवाण-घेवाणही मोठ्या प्रमाणात होते. वेगवेगळ्या क्षेत्रातील माहिती मिळत राहते. इंटरनेट विश्व हे माहितीचा खजिना असल्यामुळे प्रत्येक जण नवनवीन माहितीच्या शोधात असतो. सोशल नेटवर्किंगचे हे फायदे आहेत, यात तीळमात्र शंका नाही. परंतु काही प्रमाणात तोटेही आहेत, हेही आपल्याला मान्य करावे लागेल. खरे तर सोशल नेटवर्किंगचा वापर आपण कसा करतो, यावर सर्व काही अवलंबून असते. मध्यंतरी सोशल नेटवर्किंगचा तोटाही अनेक देशांना बसला. त्यानंतर सोशल नेटवर्किंगवर बंदी असावी, की काही प्रमाणात निर्बंध लादावेत, यावर अनेक तज्ज्ञांनी आपली मते मांडली.

सोशल नेटवर्किंगचा वापर युवकांमध्ये एवढा वाढला आहे, की अनेक जण तासन् तास आपला वेळ इंटरनेटवर घालवताना दिसतात. एक तास, एक दिवस जर इंटरनेटची सेवा कोलमडली तर काय होईल? याचा विचार न केलेलाच बरा. अनेक जण फेसबुकवर पहाटेपासून ते रात्री झोपेपर्यंत अपडेट करत असतात. इंटरनेटच्या अतिवापरामुळे घरातील सदस्यांशी बोलणे कमी झाले आहे. म्हणूनच सर्दी, खोकला झाल्याचे सर्वात प्रथम सोशल नेटवर्किंगवरील मित्रांना समजते, त्यानंतर घरात व्यक्तींना माहिती होते. मैदानी खेळही कमी होत चालल्यामुळे शारीरिक व्याधींना सामोरे जावे लागते. इंटरनेटचे स्पीड कमी झाले तरी चिडखोरपणा वाढताना दिसतो. अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणे इंटरनेट ही काळाची गरज होऊन बसली आहे. ई-मेल तपासणे, जगभरातील माहिती घेत राहणे यासाठी इंटरनेटचा वापर योग्य आहे. परंतु सहा तासांहून अधिक काळ जर इंटरनेट वापरात असाल, तर व्यसनाच्या आहारी गेल्याचे समजावे. यासाठी आपण स्वतः काही निर्बंध लादून घ्यायला हवेत. इंटरनेटमुळे जग जवळ येऊन ठेपले आहे, माहिती मिळत आहे, हे अगदी बरोबर. परंतु इंटरनेट नसल्यामुळे चिडचिडेपणा वाढत असेल, काही सुचत नसेल तर ते मग व्यसनच. त्यामुळे व्यसनाच्या आहारी जायचे की माहितीसाठी इंटरनेटचा वापर करायचा हे प्रत्येकाने ठरविणेच योग्य ठरेल.

सोशल नेटवर्किंग हे खरोखरच प्रभावी माध्यम आहे. परंतु त्याच्या आहारी जाणे हेही एक व्यसनच. इंटरनेटमुळे एक व्यापक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. मात्र त्यातील धोक्यांपासून प्रत्येकाने सावध राहण्याची आवश्यकता आहे.



## इंटरनेटचे फायदे

- जगभरातील नवनवीन घडामोडी समजण्यास मदत.
- आपले मत मांडण्यासाठी मोठे व्यासपीठ.
- सोशल नेटवर्किंगसारखे अनेक पर्याय खुले.
- काही सेकंदातच जगभरातून ई-मेल मिळू शकतात.
- जगभरातील माहिती खजिना उपलब्ध.

## इंटरनेटचे तोटे

- मैदानी खेळामुळे कमी झाल्यामुळे शारीरिक व्याधी.
- मानसिक आजार होण्याची शक्यता.
- चिडचिडेपणात वाढ.
- वैयक्तिक माहितीचा इंटरनेट क्षेत्रात गैरवापर होण्याची शक्यता.
- इंटरनेटच्या अतिवापरामुळे कुटुंबातील सदस्यांची चर्चा कमी होण्याची शक्यता.

**– संतोष धायबर**